# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)




## पात्रता विभाग

जा.क्र.: पुअहोसोविसो/पात्रताविभाग/२०२२-२३/ 245 **दिनांक: 31 JAN 2023**

**प्रति**

**मा. प्राचार्य / प्र. प्राचार्य / संचालक**

**सर्व संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ करीता पात्रता त्रुटी पुर्तता विलंबाने सादर केल्याबद्दल दंड आकारण्याबाबत.**

संदर्भ : १) विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठक दि.०३ मार्च, २०१४ ठराव क्र. [४(४)]

२) विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठक दि.०३ मार्च, २०२१ ठराव क्र. [२]

३) विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठक दि.१६ सप्टेंबर, २०२१ ठराव क्र. [७]

४) विभागाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२०-२१/२७२६ दि.२२/०३/२०२१ रोजीचे पत्र.

५) विभागाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२१-२२/७२०२ दि.२७/०९/२०२१ रोजीचे पत्र.

६) विभागाकडील परिपत्रक क्र.१-पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/४४४४ दि.१५/०६/२०२२

महोदय / महोदया,

कोविड १९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थी पात्रता अर्जातील पात्रते संदर्भातील विद्यापीठाने कळविलेल्या त्रुटींची पूर्तता विहित मुदतीनंतर सादर करतेवेळी संदर्भ क्र.३ अन्वये प्रती विद्यार्थी रु.५००/- इतका दंडाची रक्कम (संदर्भ क्र.४ व ५ अन्वये) माफ केल्याबद्दल कळविण्यात आले होते.

तसेच संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मधील तात्पुरते पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पात्रता त्रुटी सदरचे पत्र मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित सर्व कागदपत्रांसह या विभागात जमा करुन, विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता मंजूर करुन घेण्याबाबत व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची पात्रता त्रुटी पात्रतेची कार्यवाही सुरु झाल्यानंतर कळविण्यात येतील असे कळविण्यात आले होते.

संदर्भ क्र.४ नुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रता आवेदनातील त्रुटी पुर्तता सादर करण्याची अंतिम मुदत दि.२२/०४/२०२० रोजी व संदर्भ क्र.५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रता आवेदनातील त्रुटी पुर्तता सादर करण्याची अंतिम मुदत दि. २८/१०/२०२१ रोजी संपलेली आहे. याबाबत आपणस कळविण्यात येते की, विद्यापीठाने संगणक प्रणालीमधून महाविद्यालयाच्या Login मध्ये कळविलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता त्रुटींची

पूर्तता करण्याचा कालावधी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. विहित मुदतीनंतर त्रुटींची पुर्तता केल्यानंतर नियमानुसार प्रती विद्यार्थी रु.५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | पात्रता त्रुटी पुर्तता करण्याची मूदत |
|---|---|---|
| ०१ | २०१९-२० | २८/०२/२०२३ |
| ०२ | २०२०-२१ | |
| ०३ | २०२१-२२ | |
| ०४ | २०२२-२३ | संदर्भ क्र.६ मधील परिपत्रकाअन्वये |

पात्रता त्रुटी पुर्तता अहवाल विहित मुदतीत सादर न केल्यास विद्यार्थ्यांची पात्रता Hold वर ठेवण्यात येतील. त्यामुळे या विद्यार्थ्यांची द्वितीय वर्षांतील संगणक प्रणालीद्वारे प्रवेश होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस सदर महाविद्यालय, संस्था व शैक्षणिक संकुल जबाबदार राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत प्रवेश होतात, अशा विद्यार्थ्यांचे संबंधित महाविद्यालयांनी Admissions Regulating Authority, Mumbai यांच्याकडे आपल्या स्तरावर पाठपुरावा करुन विद्यार्थ्यांची मान्यता यादी तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(डॉ. गणपूर शिवकुमार)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ